# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक ता. ३१ डिसेंबर २०१९**</u>

## रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई १ जानेवारीपासून मनपा आयुक्तांचे आदेश

**नागपूर, ता. ३१ :** नागपूर महानगरपालिकेद्वारे १ जानेवारी २०२० पासून रस्ते आणि फुटपाथ मोकळे करण्याची कारवाईला प्रारंभ होत आहे. यासंबंधी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी आदेश जारी केले आहेत.

महापौर संदीप जोशी यांच्या 'वॉक अँड टॉक विथ मेयर' उपक्रमामध्ये प्रत्येक ठिकाणी रस्ते, फुटपाथवरील अतिक्रमणाच्या समस्या मांडल्या जात होत्या. रस्त्यांवरील वाहनांची पार्कींग, फुटपाथवरील दुकाने, हातठेले आदींमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या अनेक तक्रारी महापौरांपुढे मांडण्यात आल्या होत्या. शहरातील वाढत्या अतिक्रमणाच्या संदर्भात स्थायी निर्णय घेण्यासाठी महापौरांनी ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांच्या अध्यक्षतेत समिती गठीत करण्यात आली होती. या समितीचा अहवाल सभागृहामध्ये सादर केल्यानंतर मनपा आयुक्तांनी याबाबत सक्त पाउल उचलित कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

मनपा आयुक्तांच्या निर्देशानुसार शहरातील रस्ते तसेच फुटपाथ मोकळे करण्यासाठी बुधवारपासून (ता.१) कठोर कारवाई केली जाणार आहे. विशेष म्हणजे, अतिक्रमणाच्या समस्येपासून नागरिकांना दिलासा मिळावा यासाठी ही मोहिम तिव्रतेने राबविण्यात येणार असून. दिवसासह रात्रीही रस्ते व फुटपाथ मोकळे करण्याची कारवाई करण्यात येणार आहे.